| | महाराष्ट्र शासन<br>(विधी व न्याय विभाग)<br>धर्मादाय सह आयुक्त,<br>सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,<br>नांदेड विभाग, नांदेड | Govt. of Maharashtra<br>(Law and Judiciary Deptt.)<br>Joint Charity Commissioner, Nanded and<br>Public Trusts Registration Office, Nanded | |
|---|---|---|---|
| जिजामाता धर्मशाळा पब्लीक ट्रस्ट,<br>चौधरी पेट्रोल पंपाजवळ,<br>रेल्वे स्टेशन समोर, नांदेड - ०२<br>दुरध्वनी/फॅक्स ०२४६२-२४९७७० | | Jijamata Dharmashala Public Trust,<br>Near Choudhari Petrol Pump,<br>Opp. Railway Station, Nanded -02<br>Tel./Fax No. 02462-249770 | |

इ-मेल E-mail-— supdtest.nd-mh@gov.in वेब साईट Web Site- www.mahacharity.gov.in


जा.क्र. आस्था शाखा/ 1868 /२०२६ दिनांक 29/०६.२०२६

प्रति,
मा. धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

विषय :- निविदा सुचनेस संकेत स्थळावर प्रसिध्दी देण्या बाबत.

मा. महोदय,

उपरोक्त विषयी सविनय सादर करण्यात येते की, या कार्यालयात कंत्राटी पध्दतीने एकूण ४ शिपाई / पहारेकरी / सफाईगार पदावरील कर्मचारी पुरविण्यासाठी नोंदणीकत ठेकेदार/कंपनी/संस्थेकडून निविदा मागविण्यात आल्या आहेत. निविदा सुचनेची एक प्रत यासोबत सादर करण्यात येत आहे.

तरी सदरील निविदा सुचनेस धर्मादाय संघटनेच्या संकेत स्थळावर प्रसिध्दी देण्यात यावी हि विनंती.

आपली विश्वासू,

29/06/2026

(श्रीमती हिरा का. शेळके)
धर्मादाय सहआयुक्त,
नांदेड विभाग, नांदेड.

O/C

सोबत :- वरील प्रमाणे

| | |
|---|---|
| महाराष्ट्र शासन<br>(विधी व न्याय विभाग)<br>धर्मादाय सह आयुक्त,<br>सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,<br>नांदेड विभाग, नांदेड | Govt. of Maharashtra<br>(Law and Judiciary Deptt.)<br>Joint Charity Commissioner, Nanded and<br>Public Trusts Registration Office, Nanded |
| जिजामाता धर्मशाळा पब्लीक ट्रस्ट,<br>चौधरी पेट्रोल पंपाजवळ,<br>रेल्वे स्टेशन समोर, नांदेड - ०२<br>दुरध्वनी/फॅक्स ०२४६२-२४९७७० | Jijamata Dharmashala Public Trust,<br>Near Choudhari Petrol Pump,<br>Opp. Railway Station, Nanded -02<br>Tel./Fax No. 02462-249770 |
| इ-मेल E-mail-— supdtest.nd-mh@gov.in | वेब साईट Web Site- www.mahacharity.gov.in |


जा.क्र. आस्था शाखा/ 1869 /२०२६ दिनांक 29/06/२०२६

# निविदा सुचना

मा. धर्मादाय सह आयुक्त, नांदेड विभाग, नांदेड कार्यालयांसाठी शिपाई/पहारेकरी /सफाईगार पदावरील कर्मचारी पुरविण्यासाठी नोंदणीकत ठेकेदार/कंपनी/संस्थेकडून निविदा मागविण्यात येत आहे.

शिपाई, पहारेकरी,सफाईगार या पदावर कंत्राटी पध्दतीने आवश्यक असलेल्या कर्मचा-यांचा गोषवारा खालील प्रमाणे आहे.

| कार्यालयाचे नाव | आवश्यक असलेल्या शिपाई, पहारेकरी, सफाईगार पदावरील कर्मचा-यांची संख्या |
|---|---|
| सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, नांदेड | ४ |

सदरील निविदेच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे आहेत.

१. निविदे सोबत जोडलेले सर्व कागदपत्रे साक्षांकीत असावेत.

२. निविदा धाराकास अस्तीत्वात असलेल्या अनुषांगीक सर्व कायद्यांचे पालन करणे बंधनकारक राहील.

३. खाजगी कर्मचा-यांचा भविष्य निर्वाह निधी व राज्य कामगार विमा योजनांची रक्कम प्रचलीत दरानुसार मुख्य मालक म्हणुन या कार्यालयातर्फे आपल्या दरात समाविष्ठ करुन त्याचा भरणा संबंधित कार्यालयात केल्याची पावती या कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.

४. खाजगी कर्मचा-याचे वयोमर्यादा कमीत कमी १८ वर्ष व जास्तीत जास्त ३८ वर्ष राहील.

५. खाजगी कर्मचा-याचे शिक्षण किमान १२ वी पास असणे आवश्यक आहे त्यांच बरोबर विशेष शिक्षण जसे की टंकलेखन व संगणक अनुभव असणा-या खाजगी कर्मचा-यास प्रधान्य देण्यात यावे.

६. व्यसनाधीन, गुन्हेगारी पार्श्वभुमी असणा-या खाजगी कर्मचा-यास नियुक्ती देता येणार नाही. खाजगी कर्मचारी नियुक्ती पुर्वी अशा कर्मचा-याची चारित्र्य पडताळणी करुन घेणे बंधनकारक राहील.

७. बेशीस्त वर्तन करणा-या कर्मचा-यास या कार्यालयाने निर्देशीत केल्यावर त्वरीत काढुन घ्यावे लागेल.

८. खाजगी कर्मचा-यांना आठवडी सुटी देणे बंधनकारक राहील. किमान वेतनामध्ये साप्ताहीक सुटीचा समावेश असेल.

९. सदरील कर्मचा-यांना नियमाप्रमाणे वार्षिक बोनस देणे कंत्राटदाराची जबाबदारी राहील.

१०. सदरील कर्मचा-यांना अपघात झाल्यास खर्चाची पुर्तता करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील. तसेच, कर्मचा-याकडुन कार्यालयास / इतरास नुकसान झाल्यास खर्चाची पुर्तता करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

P/C

११. नियमीत आस्थापनेवरील कर्मचा-यांस मिळणारे कोणतेही फायदे कंत्राटी कर्मचा-यांना देय राहणार नाही.
१२. कुठलेही कारण न देता, कुठल्याही वेळी कंत्राट रद्द करण्याचे सर्व अधिकार धर्मादाय सह आयुक्त, नांदेड विभाग, नांदेड यांना असतील.
१३. कंपनी/एजन्सी/ संस्थेतर्फे काम करणा-यांच्या सेवेचे कोणतेही उत्तरदायित्व या कार्यालयावर राहणार नाही.
१४. निविदा मंजुर झाल्यावर सदरील निविदा प्रक्रीयेस शासनाने मान्यता दिल्यानंतर संबंधीत निविदा धारकास/कंत्राटदारास या कार्यालयाशी करार करावा लागेल. सदरील निविदा प्रक्रिया शासन मान्यतेवर अवंलबुन असेल.
१५. निविदा अर्ज पांढ-या कागदावर टंकलिखीत करुन शिपाई, पहारेकरी,सफाईगार या पदाच्या सेवेसाठी माणशी दर नमुद करुन दिनांक १५.०७.२०२६ पर्यत वरील पत्यावर कार्यालयीन वेळेत बंद लिफ्याफ्यात सादर करावी. बंद लिफाफ्यावर शिपाई, पहारेकरी,सफाईगार या पदासाठी निविदा असे नमुद करणे आवश्यक आहे. निविदे सोबत संस्था / कंपनी / एजन्सी शासनमान्य असल्याबाबतचे प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत जोडणे आवश्यक आहे.
१६. निविदा दिनांक १६.७.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता या कार्यालयातील खरेदी समिती समोर उघडण्यात येतील. त्यावेळेस, निविदा सादर करणा-या व्यक्तींना हजर राहता येईल.
१७. सदरील निविदा सुचना https://charity.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

29/6/2026

(श्रीमती हिरा शेळके)
धर्मादाय सह आयुक्त
नांदेड विभाग, नांदेड.

दिनांक :-
स्थळ :- नांदेड

प्रत –
१. कार्यालयीन नोटीस बोर्ड
२. https://charity.maharashtra.gov.in या संकेत स्थळासाठी.
३. मा. जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड , नोटीस बोर्डावर